# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 03/07/2023 (सोमवार) सायंकाळ

---

## जिवानीशी ठार करणाऱ्या आरोपीला अटक

पो.स्टे. देवलापार :— अंतर्गत ०८ किमी अंतरावर मौजा बेलदा तुंडिया नदी पुलाचे खाली दिनांक ०१/०७/२०२३ ते ०७.०० वा. ते दिनांक ०२/०७/२०२३ चे ०९.३० वा. सुमारास आरोपी नामे— राजेश बापुराव कोकोडे, वय ४० वर्ष, रा. अकोला ता. रामटेक याने फिर्यादी नामे— नरेश मयाराम खंडाते, वय ४७ वर्ष, रा. अकोला रामटेक याचा भाऊ मृतक नामे— राजेश मयाराम खंडाते, वय ४२ वर्ष, रा. अकोला ता. रामटेक याला जुन्या भांडणाचा राग मनात धरून घटनास्थळी आणुन कोणत्यातरी जड वस्तुने त्याचे डोक्यावर मारून जिवानिशी ठार केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. देवलापार येथे आरोपीविरुध्द कलम ३०२ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक सतिश मेश्राम ठाणेदार पो.स्टे. देवलापार मो. नं. ९९२३७९८६८८ हे करीत आहे.

## जबर दुखापत

पो.स्टे. खापरखेडा :— अंतर्गत ०६ कि. मी. अंतरावरील पिपळा डाग बंगला कुचक मोहल्ला येथे दिनांक ०२/०७/२०२३ चे १६.०० वा. ते दिनांक ०२/०७/२०२३ चे १८.०० वा. सुमारास फिर्यादी नामे— प्रकाश रूपचंद ताडेकर, वय २६ वर्ष, रा. पिपळा डाग बंगला वार्ड क्रमांक चार याचा भाचा जखमी नामे— अजय गोपाल मोहोबिया, वय २० वर्षे, रा. लालबाग परासिया सिग्नल जवळ छिंदवाडा हा अधून मधून कार्यक्रमा निमित्त फिर्यादीस भेटण्याकरिता येत असता यातील **आरोपी नामे—१) पवन नेवारे २) गौतम चंद्रिकापुरे ३) विकी चंद्रिकापुरे सर्व रा. कुचक मोहल्ला पिपळा डाग बंगला** यांनी फिर्यादीच्या भाच्यास तू गावातील मित्र राष्ट्रपाल व आकाश ताडेकर यांचेसोबत का फिरत असतो व त्यांच्या जुन्या झगडा भांडणाचे कारणावरून यातील आरोपीतांनी संगणमत करून अजयला दहेगाव येथून मोटार सायकलवर बसवुन घेऊन जाऊन त्यास लोखंडी पाईपने दोन्ही हातावर मारहाण करून जखमी केले व परत फिर्यादीचे दुकाना जवळ जखमी अवस्थेत आणून सोडून दिले. जखमीस उपचाराकरिता डॉक्टर जावेद हॉस्पिटल पिपळा डाग बंगला येथे नेले असता वैद्यकीय अधिकारी याने जखमीचे दोन्ही हात फॅक्चर असल्याचा अभिप्राय दिला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपीविरुध्द कलम ३२६, ३४ भादवि कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक मिश्रा पोस्टे खापरखेडा मो. क्र. ९५११२९०८४९ हे करीत आहे.

## घरफोडी

**पो.स्टे. एम.आय.डी.सी. बुट्टीबोरी** :— अंतर्गत टाकळघाट माउली ले आउट येथे दिनांक ०१/०७/२०२३ चे १८.३० वा. चे २०.०० वा. सुमारास फिर्यादी नामे— निलेश भाउराव शेळके, वय ३२ वर्षे, रा. वाघोडा ता. समुद्रपुर जि. वर्धा ह. मु. भारत गॅस गोडाउन टाकळघाट हा आपल्या पत्नीसह बाजार करून रात्री अंदाजे ०८.०० वा. घरी आला तेव्हा फिर्यादीचे घराला लावलेला कुलुप तुटुन दिसले तेव्हा फिर्यादी व त्याची पत्नी यांनी घरात जावुन पाहीले असता घराचे दुसऱ्या रूम मध्ये असलेला आलमारीचा ताला तुटलेला दिसला सामान अस्ताव्यस्त दिसले त्यामुळे फिर्यादीने लॉकर जावुन पाहीले असता त्यामध्ये ठेवलेले १) सोन्याचे दोन डोरले वाली गाठी लहान वजन १ ग्रॅम किंमती अंदाजे २०००/— रू २) एक सोन्याचे पदक वजन ३.५० ग्रॅम किंमती अंदाजे ५५००/— रू ३) सोन्याचे नथ वजन १ ग्रॅम किंमती अंदाजे २०००/— रू ४) लहान मुलाचे गळयातील ताईत अर्धा ग्रॅम किंमती अंदाजे ५००/— रू ५) नाकातील खडा किंमती अंदाजे ३००/—रू. असा एकुण १०३००/— रूपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. एमआयडीसी बुट्टीबोरी येथे आरोपीविरुध्द कलम ४५७, ३८० भादवि कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास प्रशांत काळे पोस्टे एमआयडीसी बोरी हे करीत आहे.

## पळवून नेणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल

**१) पो.स्टे. मौदा** :— दिनांक ०१/०७/२०२३ चे ०७.०० वा. चे सुमारास पो.स्टे. मौदा हद्यीत फिर्यादीची अल्पवयीन मुलगी वय १४ वर्ष ही शाळेत जातो म्हणुन घरून निघुन गेली पण घरी परत आली नाही यातील पिडीता हिला तीचे पालकाचे कायदेशिर ताब्यातुन कोणीतरी फुस लावुन पळुन नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम ३६३ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून सदर गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक चौधरी पोस्टे मौदा मो. क्र. ७०३८८२२२०५ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. उमरेड** :— दिनांक ०१/०७/२०२३ चे दुपारी १२.०० वा. ते १६.०० वा. चे सुमारास पो.स्टे. उमरेड हद्यीत फिर्यादी हा दिनांक ०१/०७/२०२३ चे सायंकाळी ०५.३० वा. दरम्यान घरी आला तेव्हा त्यास त्याची मुलगी वय १७ वर्ष ०६ महीने ही दिसुन आली नाही तेव्हा घरा शेजारी राहणारी मुलगी हिने सांगीतले कि शेजारी राहणारी मुलगी व फिर्यादीची मुलगी मैत्रिणींबरोबर मिळुन दुपारी अंदाजे १२.०० वा. दरम्यान पासपोर्ट काढण्यासाठी गेले तेव्हा मैत्रिण ही पासपोर्ट काढुन ०४.०० वा. च्या बसने घरी परत आली व फिर्यादीची मुलगी बायपास चौकात उतरुन कुठे गेली माहीती नाही परंतु ती बस मध्ये कोणीतरी मुला सोबत बोलली व गावाकडे परत जातो असे म्हटले व बस मधुन उतरली असे सांगीतले. तीचा ईतरत्र आजुबाजुला शोध घेतला असता मिळुन न आल्याने तिला कोणीतरी अज्ञात आरोपीने पळवुन नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. उमरेड येथे आरोपीविरुध्द कलम ३६३ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास महिला सहायक पोलीस निरीक्षक सुचिता मंडवाले पोस्टे उमरेड मो. नं. मो नं ९७६३२३४५४८ या करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**